सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.३.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : राजाराम श्रीरंग क्षिरसागर,
वय : ६२ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त, एपीआय,
राहणार : पिंपळगाव, ता. बार्शी, जि. सोलापुर.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती आम्रपाली कस्तुरे :-</u>**

१. दि. ३१.०३.२००९ रोजी मी कोंढवा पोलीस ठाणे येथे पीएसआय या पदवार कार्यरत होतो. सदर दिवशी गुन्हे शाखोचे पीएसआय श्री. बी.के.साळवे यांनी कॉपी राईट कायद्यांर्तगत गुन्हा दाखल केला होता. त्याचा पुढील तपास माझ्याकडे देण्यात आला होता. त्याबाबत मला लेखी आदेश देण्यात आले होते. आता मला दाखविण्यात आलेला आदेश तोच असून त्यावर ठाणे अंमलदार व पीएसआय श्री. साळवे यांच्या सह्या आहेत. त्यांच्या सह्या मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र. ३० देण्यात येत आहे. मला तपासकामी एफआयआर, फिर्यादी जबाब, जप्ती पंचनामा व आरोपींची ओळखपत्रे इत्यादी कागदपत्रे प्राप्त झाली होती. तपासकामादरमयान साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. तपासकामादरम्यान आरोपीने बनावट सीडी, व्हीसीडी, डीव्हीडी आणि अश्लील सीडी व डीव्हीडी आरोपी फायद्यासाठी विक्रि करत असल्याचे निष्पन्न झाले. सबळ पुरावा झाल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र पाठविले. अरोपीने संगनमताने त्यांना कंपनीचे हक्क नसताना त्याने बनावट सीडी, डीव्हीडीची विक्रि केली. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आज आरोपी क्र. ३ न्यायालयात हजर आहे. जप्त सीडी व डीव्हीडी मला दाखविल्यास मी ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण .**

**<u>उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे वकील श्री. पठाण यांचेमार्फत -</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदांचे तपासटिपण मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे घेतले नाही. सदर म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून कोंढवा पोलीस ठाणे ४०० मीटर अंतरावर आहे व कोंढवा पोलीस चौकी २ मीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्या साक्षीदारांची तपासटिपण नोंदविले ते छाप्यावेळी हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे व खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

समक्ष,

सहि/-

दिनांक : ०८/०७/२०२६.

(अ.अ.कुलकर्णी)
३रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.